महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
मंत्रालय, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९ ३६९६
ई-मेल: gnp.housing@maharashtra.gov.in

---

क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.७६/गृनिप	दिनांक: २२ मार्च, २०२१

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१.

विषय :- म्हाडा वसाहतींना सेवाशुल्का संदर्भात अभय योजना लागू करण्याबाबत.

संदर्भ:- आपले पत्र जा.क्र.उपमुंअ/पु/प/मुं.म/इटी-१०६/२०२१, दि.१७.०२.२०२१

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.१२.२०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये, म्हाडा वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्था/ रहिवाश्यांकडील थकीत सेवाशुल्का बाबतच्या प्रलंबित प्रश्नाबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार मुंबई मंडळांतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था/ रहिवाश्यांकडून वसूल करावयाच्या थकीत सेवाशुल्क/ सुधारीत सेवाशुल्क वसूल करण्याबाबत अभय योजनेचा प्रस्ताव सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन, आपल्या संदर्भीय दि.१७.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन, म्हाडाच्या मुंबई मंडळांतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था/ रहिवाश्यांकडून वसूल करावयाच्या थकीत सेवाशुल्क/ सुधारीत सेवाशुल्क वसूल करण्याबाबतच्या खालील अभय योजनेस शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

**<u>अभय योजना</u>**

१) "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत विविध योजनेतील गाळेधारकांकडून १ एप्रिल, १९९८ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीची सुधारीत दराने येणे असलेली रक्कम व प्रत्यक्ष भरणा केलेली रक्कम यांचे समायोजन करुन दि.३१ मार्च, २०२१ रोजी येणे असलेली उर्वरीत रकमेची मागणी गाळेधारकांकडे करावी.

२) वसूल होण्यासाठी प्रोत्साहनात्मक बाब म्हणून या वसूल योग्य रकमेवरील सन १ एप्रिल, १९९८ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीचे त्यावर होणारे व्याज माफ करण्यात यावे.

३) सदर वसूल योग्य रक्कम पुढील ५ वर्षात दहा समान हप्त्यात वसूल करण्यासही मान्यता देण्यात येत आहे. सदर वसूल योग्य रकमेचे पाच वर्षात समान १०

हप्त्यात वसूल करण्यासाठी वसूल योग्य रकमेचे ८ टक्के वार्षिक व्याज दराने उन्नतीकरण करुन दहा हप्ते पाडून, गाळेधारकांकडून दर सहा महिन्याला स्वतंत्र बिलाद्वारे वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) जे गाळेधारक सदर वसूल योग्य रक्कम प्रथम हप्त्यात एकरकमी भरण्यास तयार आहेत त्यांना व्याजाचे ८ टक्के दराने उन्नतीकरण न करता देय मूळ रक्कम वसुलीस मान्यता देण्यात येत आहे.

५) उक्त अभय योजना म्हाडाच्या मुंबई शहर व मुंबई उपनगरातील वसाहतींना लागू करण्यात यावी.

आपला,

(अरविंद शेटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

C:\Users\Vijay Palvankar\Desktop\प्रविण\प्रदिप\letters\म्हाडा पत्र प्रारुप (Recovered).doc